दैनिक
# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक ५९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.२० फेब्रुवारी २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## अमेरिका-इराण युद्धाच्या शक्यतेने शेअर बाजार कोसळला

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली आहे. सेन्सेक्स १२३६ अंकांनी कोसळला तर, निफ्टीमध्ये देखील घसरण झाली. भारतीय शेअर बाजारात आज झालेल्या घसरणीमुळं बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४७२ लाख कोटींवरुन ८ लाख कोटी रुपयांनी घसरुन ४६४ लाख कोटींवर आलं आहे. भारतीय शेअर बाजारात जोरदार विक्री करत गुंतवणूकदारांनी नफा कमावण्याचं धोरण स्वीकारल्याचं दिसून आलं. सेन्सेक्स १२३६ अंकांच्या घसरणीसह ८२४९८.१४ वर बंद झाला. तर निफ्टी ५० मध्ये ३६५ अंकांची घसरण होऊन निर्देशांक २५४५४.३५ अंकांवर बंद झाला. बीएसई १५० मिडकॅप निर्देशांक १.५४ टक्क्यांनी घसरला. तर, बीएसई २५० स्मॉलकॅप निर्देशांक १.१६ टक्क्यांनी घसरला. शेअर बाजारातील घसरणीमुळं बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४७२ लाख कोटींवरुन ४६४ लाख कोटींवर आलं आहे. बाजार विश्लेषकांच्या मते शेअर बाजारातील घसरणीचं प्रमुख कारण भू राजनैतिक तणाव हे आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षाच्या शक्यतेनं गुंतवणूकदार सतर्क झाले आहेत. मध्य पूर्व म्हणजेच आखाती देश संपूर्ण जगाला क्रूड ऑईलचा पुरवठा करतात. स्ट्रेट ऑफ हॉर्मुज कच्च्या तेलाच्या निर्यातीचा महत्त्वाचा मार्ग आहे. या ठिकाणी अडथळा निर्माण झाल्यास कच्चा तेलाचे दर वाढू शकतात. जागतिक स्तरावर महागाई वाढू शकतो आणि शेअर बाजारावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

# छत्रपती शिवरायांच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव साजरा

पुणे दि.१९ (प्रतिनिधी)- छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक राजे-रजवाडे मोगलांच्या अधिपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. छत्रपती शिवरायांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. 'हे माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. देव, देश आणि धर्मासाठी लढा देण्याची प्रेरणा देत त्यांनी सामान्य जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय-अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यकारभारात विविध सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत करप्रणाली निर्माण केली. पाणी, जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील धोका ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलदुर्ग उभारले. पोर्तुगीजांवर विजय मिळवून पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली. छत्रपतींच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, अशा शब्दात त्यांनी महाराजांचे द्रष्टेपण मांडले.

शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष राज्यातील गड किल्ले देत असल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, पंतप्रधानांच्या पुढाकाराने शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले असून २७ देशांनी एकमताने त्यास मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. त्यामुळे शिवरायांचे किल्ले आता अधिकृतपणे जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवले गेले आहेत. शिवरायांच्या कार्याची साक्ष असलेले राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.



मराठा सेवा संघाच्या निवेदनावर राज्य सरकार सकारात्मक काम करेल, तसेच मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर विचार करण्यात येईल, अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्री फडणवीस राज्यातील आणि जगभरातील शिवप्रेमींना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

## राज्यांनी सर्वांना मोफत अन्न, सायकल आणि वीज देण्याऐवजी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात

### रेवडी संस्कृतीवर सर्वोच्च न्यायालयाची टीका

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- सर्वोच्च न्यायालयाने मोफत देणग्यांच्या संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले की, ''जर सरकार सकाळपासून संध्याकाळपर्यंत मोफत अन्न, गॅस आणि वीज देत राहिले तर लोक काम का करतील? यामुळे काम करण्याची सवय नष्ट होईल. सरकारने रोजगार देण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.'' न्यायालयाने म्हटले की गरिबांना मदत करणे समजण्यासारखे असले तरी, भेदभाव न करता सर्वांना मोफत सेवा देणे योग्य नाही. ग्राहकांच्या आर्थिक स्थितीकडे दुर्लक्ष करून सर्वांना मोफत वीज देण्याचा प्रस्ताव असलेल्या तामिळनाडू पॉवर डिस्ट्रिब्युशन कॉर्पोरेशन लिमिटेडने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने म्हटले की देशातील बहुतेक राज्ये महसुलात तूट आहेत, तरीही ते विकासाकडे दुर्लक्ष करून मोफत देणग्यांची घोषणा करत आहेत.

सर्वोच्च न्यायालयात तामिळनाडू (पान २ वर)

## रोहित पवारांच्या सुरक्षेची जबाबदारी राज्य सरकारने घ्यावी; सुप्रिया सुळेंची मागणी

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेनंतर निर्माण झालेल्या शंका-कुशंकांना आता नवे वळण मिळाले आहे. अपघात की घातपात, या चर्चेमुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या प्रकरणी अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार सातत्याने प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांकडूनही काही शंका व्यक्त करण्यात आल्या. आता खासदार सुप्रिया सुळे यांनीही मौन सोडत या प्रकरणावर पहिल्यांदाच स्पष्ट भूमिका मांडली आहे.

गेल्या महिन्यात २८ जानेवारी रोजी अजित पवार यांचे विमान कोसळले आणि त्यात त्यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. मात्र काही दिवसांनंतर या दुर्घटनेविषयी अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले. रोहित पवार यांनी तीन वेळा पत्रकार परिषद घेऊन तपासाच्या गतीबाबत नाराजी व्यक्त केली. त्यांनी काही तांत्रिक बाबी आणि संबंधित कंपनीबाबत शंका उपस्थित करत तपास अधिक वेगाने आणि निष्पक्ष व्हावा, अशी मागणी केली.

या पार्श्वभूमीवर अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनीही सामाजिक माध्यमांवर पोस्ट करून 'ब्लॅक बॉक्स' संदर्भात शंका व्यक्त केली. विमान दुर्घटनेत ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाही, असे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील जनतेला या घटनेचे संपूर्ण, पारदर्शक आणि निर्विवाद सत्य जाणून घेण्याचा हक्क आहे, असे त्यांनी लिहिले. तसेच संबंधित उड्डाण सेवा देणाऱ्या कंपनीवर बंदी घालण्याची मागणीही त्यांनी केली. त्यामुळे या प्रकरणातील चर्चेला आणखी धार मिळाली.

या सर्व घडामोडींनंतर सुप्रिया सुळे यांनी सामाजिक माध्यमावर सविस्तर भूमिका मांडली. त्यांनी म्हटले की, अजितदादांच्या अपघाती मृत्यूनंतर महाराष्ट्र हादरला आहे. समाजमाध्यमांवर अनेक शंका व्यक्त केल्या जात आहेत आणि जनभावना तीव्र आहेत. लोक अजूनही शोकातून सावरलेले नाहीत. अशा वेळी रोहित पवार अभ्यासपूर्ण पद्धतीने काही मुद्दे मांडत आहेत. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळालीच पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

सुळे यांनी पुढे नमूद केले की, जर तपासात उशीर होत असेल तर अस्वस्थता वाढण्याची शक्यता आहे. ती टाळण्यासाठी संपूर्ण सत्य पारदर्शकपणे लोकांसमोर येणे आवश्यक आहे. व्यवस्थेला प्रश्न विचारणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनादत्त अधिकार आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. रोहित पवार हे जनतेच्या मनातील प्रश्न मांडत असल्याचे सांगत त्यांनी त्यांना योग्य प्रतिसाद मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## मोदी सरकारचे अमेरिकेसमोर लोटांगण:व्यापार करार म्हणजे अन्नदात्याचा गळा घोटण्याचा प्रकार-सचिन पायलट

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- व्यापार करार हे आर्थिक प्रगतीसाठी असावेत, पण ते देशाच्या सार्वभौमत्वाचा बळी देऊन केलेले नसावेत. मोदी सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली केलेला व्यापार करार हा भारतातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेसाठी आत्मघातकी ठरणार आहे. हा करार म्हणजे देशाच्या अन्नदात्याचा गळा घोटणारा प्रकार असून, भारतातील १४४ कोटी जनता ही गुलामी कधीही स्वीकारणार नाही, असा घणाघाती हल्ला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सचिन पायलट यांनी आज येथे केला.

टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत सचिन पायलट बोलत होते. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मोदी सरकारवर टीकास्त्र सोडताना सचिन पायलट म्हणाले की, या करारानुसार अमेरिकन कृषी उत्पादनांना भारतात शुल्कमुक्त प्रवेश मिळणार आहे. यामुळे महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा आणि पंजाबमधील कापूस, सोयाबीन, मका आणि सुका मेवा उत्पादक शेतकरी देशोधडीला लागतील. 'अमेरिकेच्या शेतमालाला भारतात शून्य टक्के कर, तर भारताच्या शेतमालावर १८ टक्के कर, हा कोणता न्याय?' असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

## राहुल गांधींसह २५ खासदारांना जीवे मारण्याची धमकी

### काँग्रेसचा भाजप-आरएसएसवर गंभीर आरोप; पवन खेडा यांनी शेयर केला एक्सवर व्हिडिओ

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- विरोधी पक्षाचे नेते आणि काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी प्राप्त झाली आहे. राहुल गांधी यांच्यासह २५ अन्य काँग्रेस खासदारांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. राहुल गांधी हे लोकसभेचे विरोधी पक्षनेते आहेत. काँग्रेस नेत्याने याबाबत एक व्हिडिओ शेयर केला आहे. हा व्हिडिओ राजस्थानमधील असल्याचे समोर आले असून संबंधित व्यक्तीला अटक करण्यात आल्याचे समोर आले आहे. नवराष्ट्रने हे वृत्त दिले आहे.

संपूर्ण भाजप आणि आरएसएस ही गोडसे फॅक्टरी आहे. तथाकथित करणी सेनेने राहुल गांधी यांच्यासह २५ खासदारांना दिलेल्या धमक्या या वेगळ्या घटना नाहीत. या एका सुनियोजित कटाच्या भाग आहे. सर्वात पहिल्यांदा किरेन रिजिजू यांनी सभागृहात काँग्रेस खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांचा अपमान केल्याचा खोटा दावा केला. उपलब्ध व्हिडिओमध्ये अपमान झाल्याचे दिसून येत नाही. तर यामध्ये सभापति हसताना दिसून येत आहेत. राहुल गांधी हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी सर्वात मोठा धोका असल्याचे भाजप खासदारांनी विविध व्यासपीठावर सांगण्यास सुरुवात केली. विरोधकांना खास करून राहुल गांधी यांना बदनाम करण्यासाठी आखण्यात आलेली ही एक सुनियोजित मोहीम आहे. तेव्हा देखील एक गोडसे तयार केला होता आणि आता देखील एक गोडसे तयार केला जात आहे.

(पान २ वर)

## सरकारची कामे गलगोटिया विद्यापीठासारखी बनावट; आदित्य ठाकरेंचा घणाघात

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानाच्या सुशोभिकरणाच्या कामाचा शुभारंभ आज शिवजयंती निमित्त मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि युवासेनाप्रमुख शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे ह्यांच्या उपस्थित श्रीफळ वाढवून करण्यात आला. मात्र, या कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना आदित्य ठाकरे यांनी राजकीय मुद्द्यांवरून सत्ताधाऱ्यांवर टीकेची तोफ डागली. विशेषतः दिल्लीतील रोबोटिक कुत्र्याच्या वादावरून त्यांनी राज्य सरकारची तुलना बनावट कामांशी केली. यासोबत आदित्य ठाकरे यांनी राज्यसभा निवडणुकीवर भाष्य करताना, एका जागेवर दावा ठोकला आहे.

दिल्लीतील एआय एक्स्पोमध्ये गलगोटिया विद्यापीठाने विद्यार्थ्यांऐवजी चीनमध्ये बनवलेला रोबोटिक कुत्रा स्वतःचा म्हणून प्रदर्शित केला. या वादाचा संदर्भ देत आदित्य ठाकरेंनी सरकारवर निशाणा साधला. ''सरकार खोदून काढायचे झाले तर सगळेच भ्रष्टाचाराने पोखरलेले आहेत. आजच्या सरकारची कामे गलगोटिया विद्यापीठासारखीच बनावट झाली आहेत. हे सरकार भ्रष्टाचाराने पोखरलेले असून जगात आमची नाचक्की होत आहे,'' अशी टीका त्यांनी केली. (पान २ वर)

## एसटी संघटनेचे २४ फेब्रुवारी रोजी 'बोंब मारो' आंदोलन

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने निधीच्या मागणीसाठी राज्य सरकारकडे १६ वेळा पत्रव्यवहार केला असून राज्य सरकारच्या परिवहन विभागाकडून अनेक वेळा पत्रव्यवहार केल्यानंतरही अर्थ खात्यातील अधिकारी त्याकडे लक्ष देत नाहीत.

अर्थ खात्याचा कार्यभार असलेले राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी लक्ष घालून झोपेचे सोंग घेतलेल्या अधिकाऱ्यांची कानउघडणी करावी. अन्यथा २४ फेब्रुवारी रोजी एसटी कर्मचाऱ्यांसह आझाद मैदानात 'बोंब मारो' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस संघटनेने दिला आहे.

एसटी महामंडळाच्या राज्यभरातील कर्मचाऱ्यांना वेतनासोबत या महिन्यात वेतनवाढ फरक हप्ता मिळाला नसून, निधीच्या मागणीचा दस्ताऐवज राज्य सरकारच्या अर्थ खात्यात निर्णयाविना पडून आहे. हप्ता न मिळाल्याने कामगारांमध्ये असंतोष पसरला आहे. यासंदर्भात एसटी महामंडळ, राज्य सरकारच्या परिवहन विभागाने वारंवार पत्रव्यवहार करून सुद्धा अर्थ खात्यातील अधिकारी या दस्ताऐवजाकडे लक्ष द्यायला तयार नाहीत.

एसटी महामंडळातील ८६ हजार कर्मचाऱ्यांना या महिन्यात वेतनवाढ फरक रक्कम हप्ता मिळालेला नाही. त्यासाठी एसटीने राज्य सरकारकडे १९२.४६ कोटी रुपयांची मागणी केली. दर महिन्याला सरकारकडून येणाऱ्या सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कमेसह एकूण ७२५.४६ कोटी रुपये निधीची मागणी केली होती.

मात्र केवळ ४०० कोटी रुपये राज्य सरकारकडून देण्यात आल्याने एसटीचे आर्थिक गणित बिघडले. या महिन्यात वेतनवाढ फरकाची वाढीव रक्कम कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली नाही. याला निव्वळ राज्य सरकारचे अर्थ खात्यातील अधिकारी जबाबदार असून उर्वरित रक्कम येत्या सोमवारपर्यंत न मिळाल्यास मंगळवारपासून कर्मचाऱ्यांचा आक्रोश व असंतोष आंदोलनातून दिसून येईल, असे महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी सांगितले.

## आरटीई अंतर्गत ऑनलाईन प्रवेशास सुरुवात; आर्थिक, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शाळेत मोफत प्रवेश

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- देशातील शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार मिळाला आहे. त्यामुळे, इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्येही गरीब कुटुंबातील आणि वंचित घटकातील बालकांना मोफत प्रवेश मिळण्यासाठीच्या प्रक्रियेला यंदाच्यावर्षी सुरुवात झाली आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत (आरटीई) दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळांमध्ये २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. बालकांच्या पालकांना यासाठी संबंधित अर्ज भरण्याची प्रक्रिया १७ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ही प्रक्रिया राबविण्याबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्या असल्याची माहिती शालेय शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी दिली आहे.

आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा/विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक (पान २ वर)

## धनंजय मुंडेंच्या अडचणी वाढण्याची शक्यता; मनोज जरांगेंचा आणखी एक आरोप

बीड दि.१९ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना एक गंभीर प्रकरण उघड केल्याचा दावा केला आहे. रंजना नागपूरकर या महिलेने केलेल्या आरोपांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, त्यांच्या पती प्रदीप नागपूरकर हे पोलिस दलात कार्यरत होते. एका प्रकरणाचा निकाल अनुकूल लावून देण्यासाठी धनंजय मुंडे यांना १७ लाख रुपये देण्यात आल्याचा आरोप संबंधित महिलेने केला आहे. मात्र पैसे देऊनही अपेक्षित काम झाले नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

जरांगे पाटील यांच्या म्हणण्यानुसार, या आर्थिक व्यवहारामुळे आणि कामाच्या अनिश्चिततेमुळे नागपूरकर कुटुंबावर मोठा मानसिक ताण निर्माण झाला. रंजना नागपूरकर यांनी असा दावा केला आहे की, या प्रचंड मानसिक दबावाखालीच त्यांच्या पतीचा मृत्यू झाला. या घटनेमुळे त्या पूर्णपणे कोलमडून गेल्या असून न्याय मिळावा म्हणून त्यांनी आपली व्यथा मांडली आहे, असे जरांगे यांनी सांगितले. त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणीही केली.

या आरोपांदरम्यान जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही उल्लेख केला. देवेंद्रजी, कदाचित तुम्हाला ही बाब माहिती नसेल; पण हा प्रकार तुमच्याच जवळच्या नातेवाईकांशी संबंधित आहे, असे ते म्हणाले. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या शोभा फडणवीस यांच्या बहिणीची मुलगी नागपूरकर यांच्या घरी दिलेली असल्याचा उल्लेख त्यांनी केला. त्यामुळे हे प्रकरण तुमच्या जवळच्या पाहुण्यांशी संबंधित आहे, असे सांगत त्यांनी सरकारने संवेदनशीलतेने लक्ष घालावे, असे आवाहन केले.

जरांगे पाटील यांनी पुढे सांगितले की, रंजना नागपूरकर त्यांच्याकडे भेटीसाठी आल्या होत्या. त्या अत्यंत व्यथित अवस्थेत होत्या आणि रडत होत्या, असे त्यांनी सांगितले. पतीच्या निधनाला हेच प्रकरण कारणीभूत असल्याचा त्यांचा ठाम आरोप आहे. न्याय मिळवण्यासाठी त्या प्रयत्न करत असून, आपले पैसे परत मिळावेत आणि जबाबदारांवर कारवाई व्हावी, अशी त्यांची मागणी आहे.

रंजना नागपूरकर यांनी केवळ पैशांची फसवणूक झाल्याचा आरोप केलेला नाही, तर धमकीचाही गंभीर दावा केला आहे. पतीच्या निधनानंतर जेव्हा त्या आपले पैसे परत मागण्यासाठी परळी येथे गेल्या, तेव्हा त्यांना मुंडे यांच्या समोरच पिस्तूल लावून धमकावण्यात आले, असा त्यांचा आरोप आहे. पैसे परत न देता उलट जीवे मारण्याची भीती दाखवून त्यांना हाकलून लावण्यात आले, असे त्यांनी म्हटले आहे. या सर्व आरोपांमुळे राज्यात खळबळ उडाली असून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी विविध स्तरातून होत आहे.

## मुंबई विमानतळावर हिरे, सोनं अन् कोट्यवधींचे अमली पदार्थ जप्त, ८ जणांना अटक

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत देश-विदेशातून येणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. तर, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरही प्रवाशांची नेहमीच वर्दळ असते. त्यामुळे, मोठी सुरक्षा यंत्रणा देखील येथे कार्यरत असल्याचं दिसून येतं. त्याच पार्श्वभूमीवर मुंबई विमानतळावर अनेकदा तपासणीत अंमली पदार्थ किंवा तस्करीचे सोनं आढळून येतं. नुकतेच, ४ ते ११ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कस्टम विभागाने मोठी कारवाई करत कोट्यवधिचं साहित्य जप्त केलं आहे. याप्रकरणी, ८ जणांना अटकही करण्यात आलीय.

मुंबई कस्टम झोन - ३ (एअरपोर्ट) यांनी मोठी कारवाई करत विविध प्रकरणांत मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ, हिरे, सोने आणि परकीय चलन जप्त केले आहे. या कारवाईत एकूण ८ प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. कस्टम्सकडून मिळालेल्या माहितीनुसार, कारवाई जवळपास १६.७ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ, ३८ लाख रुपयांचे हिरे, १५ लाख रुपयांचं सोनं आणि विविध प्रकरणात १.१३ कोटी रुपयांचे परकीय चलन असा मोठा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील जलसंवर्धन कार्य

छत्रपती शिवाजी महाराज यांची ओळख स्वराज्य निर्माता म्हणून जितकी आहे तितकीच रयतेचा राजा म्हणून देखील आहे. आपल्या स्वराज्यात असणारी प्रजा ही सर्वाधिक महत्वाची आहे.. त्यांच्या समस्या सोडवणे याला प्राधान्य असले पाहिजे याबाबत ते आग्रही होते.

राजांची ओळख कुशल प्रशासक म्हणून देखील आहे. यासोबतच रयतेचा राजा म्हणून त्यांनी शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या रयतेसाठी असणारे पाण्याचं महत्व जाणलं आणि यासाठी त्यांनी जलसंवर्धन कार्याला वेगळे आयाम दिले. त्यांचे याबाबतीत असलेला अभ्यास आणि धोरणीपणा आजच तितकाच मोलाचा ठरतो.

आपला देश हा मौसमी हवामान क्षेत्रात आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी नवी नाही. त्याकाळी आणि आजही शेती पावसावरच अवलंबून आहे. त्यामुळेच त्यांचे या क्षेत्रात असणारे योगदान आजही मार्गदर्शक असे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात जलव्यवस्थापनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. पाणी ही केवळ जीवनावश्यक गरज नसून शेती, लोककल्याण आणि किल्ल्यांची सुरक्षा यासाठीही ते तितकेच आवश्यक आहे, याची महाराजांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळे त्यांच्या काळात जलसंवर्धन, पाणी साठवण आणि योग्य वापर यावर विशेष भर देण्यात आला.



**भौगोलिक परिस्थितीची जाण**

महाराष्ट्राचा मोठा भाग डोंगराळ व पावसावर अवलंबून आहे. विशेषतः सह्याद्री पर्वतरांगांमध्ये पाण्याचे स्रोत ऋतुनिष्ठ असतात. ही परिस्थिती ओळखून शिवाजी महाराजांनी पावसाचे पाणी अडवणे आणि साठवणे यावर भर दिला.

किल्ल्यांवरील जलव्यवस्था

शिवकालीन किल्ले ही जलसंवर्धनाची उत्कृष्ट उदाहरणे मानली जातात.

**रायगड किल्ला, राजगड किल्ला यांसारख्या किल्ल्यांवर:**

-दगडात कोरलेली टाकी (पाण्याची टाकी) बांधण्यात येत

-पावसाचे पाणी साठवण्यासाठी तलाव तयार केले जात -झऱ्यांचे पाणी सुरक्षित मार्गाने टाक्यांमध्ये आणले जात

-किल्ल्यावर वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा राखला जाई यामुळे दीर्घकालीन वेढ्यातही किल्ले टिकून राहत.

**लोकाभिमुख धोरण**

शिवाजी महाराजांच्या प्रशासनात प्रजेच्या गरजांना प्राधान्य होते. गावागावांत विहिरी, तलाव, बंधारे बांधण्यास प्रोत्साहन दिले जाई. शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध राहावे यासाठी लहान सिंचन व्यवस्थाही उभारल्या गेल्या आणि त्यामुळे गावागावात पाण्याची उपलब्धता सातत्यपूर्ण होती ज्यामुळे जीवनाला स्थर्य प्राप्त होऊ शकले. गावालगत असणाऱ्या मंदिरालगत असणाऱ्या विहिरी आणि बारव आपण आज ही अस्तित्वात आहेत असे बघतो.

**पर्यावरणपूरक दृष्टीकोन**

जलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी जंगलांचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. डोंगरउतारांवरील झाडी राखल्याने पाणी धरून ठेवण्यास मदत होते, याची जाण त्या काळातही होती. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा समतोल राखण्याची परंपरा दिसून येते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जलसंवर्धन कार्य हे दूरदृष्टी, शास्त्रीय विचार आणि स्थानिक भौगोलिक जाण यांचे सुंदर मिश्रण होते. आजच्या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर शिवकालीन पाणी व्यवस्थापन आपल्याला शाश्वत जलवापराचा मौल्यवान धडा देते. त्यांच्या कार्यपद्धतीतून प्रेरणा घेऊन आधुनिक काळातही जलसंवर्धन अधिक प्रभावीपणे राबवता येऊ शकते.

**– प्रशांत दैठणकर**
९८२३१९९४६६



# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)– छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसिलदार संजय शिंदे, महसुल सहायक प्रेमसिंग राजपुत यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# सांस्कृतिक व महसूल विभागाकडून शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)– सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८ व १९ फेब्रुवारी रोजी मराठवाडा महसूल प्रबोधिनी येथे शिवजन्मोत्सवानिमित्त भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या सोहळ्यात ऐतिहासिक परंपरेचा जागर आणि सांस्कृतिक वारशाचा अभिमान व्यक्त करण्यात आला.




कार्यक्रमाची सुरुवात अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे व उपजिल्हाधिकारी श्रीमती संगीता राठोड यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची आठवण करून दिली. त्यांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि लोकाभिमुख प्रशासन पद्धतीचा आजच्या पिढीने आदर्श घ्यावा, असे मत व्यक्त करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत श्री. खंडेराय कला मंडळम यांच्या ३५ कलावंतांच्या पथकाने बहारदार सादरीकरण केले. महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासावर आधारित नृत्यनाट्य, पारंपरिक लोककला, लावणी, पोवाडा आणि देशभक्तीपर गीतांनी सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. विशेषतः पोवाड्याच्या माध्यमातून शिवचरित्रातील पराक्रम जिवंत करण्यात आला, तर लोकनृत्यांच्या सादरीकरणातून महाराष्ट्राची सांस्कृतिक विविधता प्रभावीपणे दर्शविण्यात आली.

या कार्यक्रमात प्रा. समाधान इंगळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्राचा अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी परिचय करून दिला. त्यांनी शिवकालीन प्रशासन व्यवस्था, स्वराज्य स्थापनेतील संघर्ष आणि सामाजिक बांधिलकी यांवर प्रकाश टाकत उपस्थितांना इतिहासाचा नव्याने परिचय करून दिला. त्यांच्या भाषणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या सांस्कृतिक सोहळ्यामुळे इतिहास, संस्कृती आणि राष्ट्राभिमान यांचा संगम अनुभवण्याची संधी उपस्थितांना मिळाली.

शिवजन्मोत्सवाचे हे आयोजन केवळ सांस्कृतिक कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, नव्या पिढीमध्ये स्वराज्याच्या मूल्यांची जपणूक आणि राष्ट्रीय अभिमान जागविण्याचा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला.

# वैजापूरातील विद्याधन इंग्रजी माध्यमाच्या विद्यालयातर्फे विविध उपक्रमातून शिवाजी महाराजांना वंदना



वैजापूर दि.१९ (प्रतिनिधी)- 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'जय भवानी -जय शिवराय,' हर,हर ,महादेव,'राजमाता जिजाऊ माँ साहेबांचा विजय असो,तुमचं आमच नात काय-जय जिजाऊ जय शिवराय'अशा घोषणा देत,व लेझीम खेळत,लाठी -काठी,व दांड पट्टा चालवत ,तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ सजीव देखावा सादर करीत येथील छत्रपती बहुउद्धेशिय

सेवा भावी संस्था संचलित विद्याधन इंग्लिश माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी या ११व्या वर्षी शानदार प्रदर्शन करीत येवला नाका ते शिवाजी महाराज पुतळ्यापर्यत,लेझीमखेळणे, काठी फिरविणे तसेच विविध कला,कौशल्य,व गुण दर्शन करीत फेरी काढून छत्रपती शिवाजी महाराजाना अभिवादन केले.संस्थेच्या अध्यक्षा आशा पा,गायके,उपाध्यक्ष कल्याणी गायके,व सचिव दिगंबर गायके यांच्या उपस्थितीत वैजापूर -गंगापूर तालुक्याचे ना.प्रा,रमेश पाटील बोरनारे व सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी येवला नाका येथे शिवाजी महाराज चौफुली पूजन,व प्रतिमा पूजन करून श्रीफळ अर्पण केला व ही कला गुण दर्शन सादर करणारी शोभा मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत नेण्यात येऊन पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी यांनीही या मिरवणूकिला भेट दिली ,या प्रसंगी संजय बोरनारे रामहरी बापू जाधव,राजेन्द्र पाटील साळुंके,नगरसेवक बाबासाहेब पुतळे, अविनाश त्रिभुवन,श्रीकांत साळुंके, शांतीलाल कोठाळे, प्राचार्य आरती पाटील,मुख्याध्यापक राहुल जाधव,मोहिनी मापारी,लांडे पाटील,महेश दिवेकर,गोविंदा त्रिभुवन,पूनम भागवत,श्रद्धा कासार,महादेवी शिनगारे,पूर्वा जाखडे,योगिता पाटणी ,अर्चना व दुर्गा गायकवाड, तुषार तूपे, दीपाली भुजाडे,गौरी थोटे विद्यार्थी, पालक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर येथे प्रशस्त सहकार संकुलाची निर्मिती करा – सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर



मुंबई, दि . १८: छत्रपती संभाजीनगर विभागीय ठिकाण असल्यामुळे सहकार विभागाची अनेक कार्यालये शहरात आहेत. नागरिकांच्या व सहकारी संस्थांच्या सभासदांच्या सोयीसाठी ही संपूर्ण कार्यालये एकाच छताखाली आणणे गरजेचे आहे. त्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे सहकार संकुलाच्या सोईसुविधा युक्त प्रशस्त इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करावे, असे निर्देश सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

बैठकीला अतिरिक्त आयुक्त नागनाथ इगलेवार, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय सहनिबंधक संतोष बिडवाई, जिल्हा उपनिबंधक समृत जाधव, जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत कार्यरत कार्यकारी अभियंता प्रिया पुजारी आदी उपस्थित होते. सहकार राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, सहकार संकुलाची स्थापत्य विषयक कामे पूर्ण करण्यासाठी गती वाढवावी. या इमारतीमध्ये कार्यालयीन कामासाठी आलेल्या नागरिकांना विविध सोयी सवलती असतील, याची खात्री करावी. कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची काम पूर्ण करण्यात यावी. संबंधित कंत्राटदाराने विहित काल मर्यादित काम पूर्ण करावे. काम पूर्ण करण्यामध्ये विलंब लागल्यास खर्च वाढतो. त्यामुळे यंत्रणेने कंत्राटदाराकडून काम पूर्ण करण्यासाठी दक्षता घ्यावी. कामाला विलंब झाल्यास कंत्राटदारावर नियमानुसार कारवाई करावी, असे निर्देशही राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी दिल्या. **असे आहे सहकार संकुल** – सहकार संकुलामध्ये प्रशासकीय इमारत तळमजला अधिक सात माळ्यांची असून एकूण बांधकाम क्षेत्रफळ १८५२४ चौरस मीटर आहे. तसेच निवासी इमारतही सात माळ्यांची आहे. संकुलामध्ये पार्किंगची प्रशस्त व्यवस्था, दिव्यांग बांधवांसाठी रॅम्प, चार उद्वाहक, अतिथी गृह, भोजनकक्ष असणार आहे. या सहकार संकुलात जिल्हा उपनिबंधक, विशेष लेखा परीक्षक वर्ग दोन, सुनावणी हॉल, नोंदणी कक्ष, भांडार कक्ष, कार्यालयीन कर्मचारी कक्ष, विभागीय सहनिबंधक कार्यालय, विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (फिरते पथक), तालुका उपनिबंधक, विशेष लेखापरीक्षक वर्ग दोन (सहकारी संस्था), प्रादेशिक सहसंचालक (साखर), प्रथम विशेष लेखापरीक्षक वर्ग एक (साखर), द्वितीय विशेष लेखापरीक्षक (साखर), विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (बँक), सहकार न्यायालय, विशेष लेखापरीक्षक (दुग्ध), विशेष लेखा परीक्षक (कापूस) आदी कार्यालये तसेच प्रशिक्षण सभागृह आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन





छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले. सकाळी क्रांती चौक येथे सिंहासन आरुढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास मां. महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी मां. आयुक्त जी श्रीकांत,मां.नगरसेवक अनिल मकरिये,जालिंदर शेंडगे,नंदलाल गवळी,शिल्पा राणी वाडकर,कीर्ती शिंदे ,नंदकुमार घोडेले,अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे,उप आयुक्त लाखिचंद चव्हाण,उद्यान अधिक्षक विजय पाटील,आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ पारस मंडलेचा,कार्यकारी अभियंता बाळासाहेब शिरसाट,माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद आदींची उपस्थिती होती.

यानंतर मनपा मुख्यालय टप्पा क्र.०३ येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मां. नगरसेविका करुणा जाधव ,अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील,कल्पिता पिंपळे,आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ पारस मंडलेचा,उप आयुक्त लाखिचंद चव्हाण,नंदकिशोर भोंबे,सांस्कृतिक अधिकारी शंभू विश्वासू,संजय सुरडकर ,वॉर्ड अभियंता कुलकर्णी,माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद,विभागाचे रविंद्र खरात, अतुल बनकर,संतोष कोठाळे आदींची उपस्थिती होती.

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तू संग्रहालय येथे मां. महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी त्यांनी जिवाजी महाले यांच्या पुतळ्यास देखील पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी मां. नगरसेविका करुणा जाधव,अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील,उप आयुक्त लखीचंद चव्हाण,नंदकिशोर भोंबे, अभय प्रामाणिक,वस्तू संग्रहालयाचे पूरवार,सांस्कृतिक अधिकारी शंभू विश्वासू,सय्यद जमशेद,रविंद्र खरात, अतुल बनकर,संतोष कोठाळे आदींची उपस्थिती होती

(पान १ वरुन)

## राहुल गांधींसह २५ खासदारांना...

ज्या प्रकारे संसदेत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांचा अपमान केला. त्याचा आम्ही निषेध करतो. राहुल गांधी यांच्या सांगण्यावरून हे केले गेले असल्याचे या व्हीडिओत सांगण्यात आले आहे. पुन्हा असे घडले तर आम्ही घरात घुसून गोळ्या मारू आणि याला प्रशासन जबाबदार असेल, हे राहुल गांधी यांनी लक्षात ठेवावे. २४ तासांत त्या खासदारांना अटक झाली तर ठीक. नाहीतर प्रत्येकाला घरात घुसून आम्ही गोळ्या मारू, असे या व्हीडिओतून धमकी देण्यात आली आहे. ही धमकी करणी सेनेच्या कार्यकर्त्याकडून देण्यात आल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान या व्यक्तीला अटक करण्यात आल्याचे समोर आले आहे.

## राज्यांनी सर्वांना मोफत अन्न,...

वीज वितरण महामंडळाच्या याचिकेवर सुनावणी सुरू होती. कंपनीने २०२४ च्या वीज सुधारणा नियमांच्या नियम २३ ला आव्हान दिले. त्यात सर्व ग्राहकांना त्यांची आर्थिक स्थिती विचारात न घेता मोफत वीज देण्याचा प्रस्ताव आहे. राज्य सरकार दर दोन महिन्यांनी कोणत्याही अटीशिवाय घरगुती ग्राहकांना १०० युनिटपर्यंत मोफत वीज पुरवते, म्हणजेच ग्राहकांना त्यांचा वापर कितीही असो, पहिल्या १०० युनिटसाठी बिल भरावे लागत नाही. या प्रकरणात न्यायालयाने केंद्र सरकार आणि इतर पक्षांना नोटिसा बजावल्या आहेत. वीजदर जाहीर झाल्यानंतर तामिळनाडूच्या कंपनीने अचानक मोफत वीज देण्याचा निर्णय का घेतला, असा प्रश्नही न्यायालयाने विचारला. मोफत रेशनबाबत न्यायालयाने कडक टिप्पणी करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी, १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, "तुम्ही त्यांना मोफत रेशन देत असल्याने लोक काम करू इच्छित नाहीत. तुम्ही काहीही न करता त्यांना पैसे देत आहात."

न्यायालयाने केंद्र सरकारला विचारले, "या लोकांना मुख्य प्रवाहात समाजात समाविष्ट करण्याऐवजी, मोफत योजना राबवून तुम्ही परजीवींची पिढी निर्माण करत नाही का?"

## सरकारची कामे गलगोटिया...

दिल्लीतील एआय समिटमध्ये सध्या मोठा गोंधळ सुरू असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. जगभराचे लक्ष या समिटकडे आहे, पण तिथे पाणी नाही, जेवणाची व्यवस्था नाही. कोणत्याही नेत्यांच्या फोटो तिथे लावले जात नाहीत, पण सरकारने नेत्यांची फोटो लावले, तिथे फक्त कृत्रिम बुद्धिमत्तेचे काम दाखवले जाते, असेही आदित्य ठाकरे म्हणाले. मुंबईतील विकासकामांवर बोलताना आदित्य ठाकरे यांनी थेट भ्रष्टाचाराचे आरोप केले. "सुशोभीकरणाचा ९९ टक्के निधी केवळ सत्ताधारी लोकांशी संबंधित कंत्राटदारांकडे गेला आहे. मुंबईत एकही रस्ता पूर्ण झालेला नाही, पण अनेक ठिकाणी डबल रंगरंगोटी करून पैसे लाटले जात आहेत. आमचे काम गलगोटियासारखे बनावट नाही. आम्ही जे करतो ते प्रत्यक्षात दिसते. असले डुप्लिकेट काम फक्त हे डुप्लिकेट सरकारच करू शकते," अशा कठोर शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांना फटकारले.

## आरटीई अंतर्गत ऑनलाईन...

वर्ग या स्तरावर २५ टक्के प्रवेश प्रक्रियेकरिता पालकांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. वंचित घटकांतील बालकांमध्ये अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), (क), (ड) इतर मागासवर्ग (ओबीसी), विशेष मागासवर्ग (एसबीसी), आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटक, एचआयव्ही बाधित किंवा प्रभावित बालक, अनाथ बालके, दिव्यांग बालके अथवा कोविड प्रभावित बालकांचा समावेश होतो. तर, आर्थिक वर्षामध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी आहे अशा बालकांचा आर्थिक दुर्बल गटामध्ये समावेश होतो. बालकांच्या पालकांना त्यांच्या निवासस्थाच्या ठिकाणापासून एक किमी पेक्षा कमी अंतरावरील शाळा (हवाई अंतर) आरटीई पोर्टलवर दिसतील. या अनुषंगाने प्रक्रियेकरिता विचारपूर्वक १० शाळांची निवड करण्यात यावी आदी सूचना शिक्षण संचालनालयामार्फत देण्यात आल्या आहेत.

# शिवजयंतीचा 'रॉयल' थाट! छत्रपती संभाजीनगरमध्ये हेलिकॉप्टरमधून महाराजांच्या स्मारकांवर पुष्पवृष्टी

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी शहरात अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. नवीन छत्रपती संभाजीनगर गणेश महासंघाच्या शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने यंदा शहरातील प्रमुख शिवस्मारकांवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. आकाशातून होणारा हा फुलांचा वर्षाव आणि शिवरायांचा जयघोष यामुळे संपूर्ण शहर शिवमय झाले होते.

